सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २६९ | रविवार, दि. २१ जून २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
**सोने-चांदी**
**आजचे भाव**
२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १४६८००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३४५००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ १११६००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २४००/-
भाव प्रती १० ग्राम


# मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे आज योग, मोफत मोतीबिंदू शिबिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे जागतिक योग दिनानिमित्त रविवार, दि. २१ जून २०२६ रोजी नागरिकांच्या आरोग्य संवर्धनासाठी विशेष योग शिबिर व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. श्री मंगळग्रह मंदिरात सकाळी ७ ते १० या वेळेत योग शिबिर होईल. या उपक्रमातून आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देण्यासोबतच नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे.

**आंतरराष्ट्रीय योग दिन**

योग शिबिरात आरोग्यदायी जीवनशैली, तणावमुक्ती, प्राणायाम तसेच ध्यान याविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. योगामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते, याबाबतही उपस्थितांना माहिती दिली जाईल. तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली मोफत तपासणी, आवश्यक औषधोपचार आणि मोफत शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे गरजू व ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या दोन्ही शिबिरांत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्यासह समस्त विश्वस्त मंडळाने केले आहे.



आजचे
**अभीष्टचिंतन**






**श्री. किशोर पाटील**
माजी नगरसेवक



**श्री. राजेश कुंदनानी**
अमळनेर



*अमळनेर : शहरातील पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर अमळनेर तालुका शहर विकास आघाडीने सोमवार, दि. २२ जून २०२६ रोजी मोर्चा काढण्याबाबत शनिवार, दि. २० जून रोजी पालिकेस पूर्वसूचना पत्र दिले होते. त्यावर मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी 'शविआ'च्या गटनेत्यांना प्रस्तावित मोर्चा स्थगित करण्यासंदर्भात विनंती पत्र दिले. त्यानंतर दुपारी 'शविआ'च्या गटनेत्या सौ. जयश्रीताई पाटील यांनी बोलाविलेल्या बैठकीस उपस्थित नगरसेवक डॉ. डिगंबर महाले, विजय पाटील, सचिन पाटील, शोभाबाई गढरे, चेतन राजपूत, जितेंद्र ठाकूर, नरेंद्र संदानशीव, विक्रांत पाटील, मुक्तार खाटीक, विजय राजपूत, नसरोद्दीन हाजी, सयाजीराव पाटील, नरेंद्र चौधरी, ॲड. यज्ञेश्वर पाटील, भूषण भदाणे, निलेश महाजन, संजय भिला पाटील, इम्रान खाटीक, गौरव महाजन, दुर्गेश पाटील, सुनील शिंपी, आशाबाई चावरिया, आरिफ मेवाती, तुषार संदानशीव, वेद पाटील आदी.*

# 'शविआ'चा सोमवारी निघणारा मोर्चा मुख्याधिकाऱ्यांच्या विनंतीमुळे तूर्त स्थगित

## पालिकेला पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी 'शविआ' देणार आठ दिवसांचे 'अल्टिमेटम'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर अमळनेर तालुका शहर विकास आघाडीने सोमवार, दि. २२ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता काढण्यात येणाऱ्या मोर्चासंदर्भात आज शनिवार, दि. २० जून रोजी पालिका मुख्याधिकाऱ्यांना पूर्वसूचनेचे पत्र दिले. त्याची पालिका प्रशासनाने अतिशय गंभीरतेने दखल घेऊन शहर विकास आघाडीच्या गटनेत्या सौ. जयश्रीताई पाटील यांना प्रस्तावित मोर्चा स्थगित करण्याची विनंती पालिका मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी पत्राद्वारे केली आहे. त्यामुळे दि. २० जून रोजी सौ. जयश्रीताई पाटील यांनी 'शविआ'चे सर्व नगरसेवक व पदाधिकारी यांची मुख्याधिकाऱ्यांच्या पत्रावर निर्णय घेण्यासाठी दुपारी चार वाजता तातडीची बैठक घेतली. सदर बैठकीत मोर्चा तूर्त स्थगित करण्याचे ठरले. मात्र, सौ. जयश्रीताई पाटील यांनी मुख्याधिकाऱ्यांना मोबाईलवरून सोमवार, दि. २२ जून रोजी दुपारी चार वाजता 'शविआ'सोबत चर्चा करण्यासाठी पालिकेत उपस्थित राहण्यास सांगितले.

सोमवार, दि. २२ जून रोजी सौ. जयश्रीताई पाटील यांच्या नेतृत्वाखाली 'शविआ'चे सर्व नगरसेवक आणि प्रमुख पदाधिकारी पालिकेत मुख्याधिकाऱ्यांसह सर्व विभागप्रमुखांसोबत शहरातील पाणी समस्येसह विविध नागरी सोयी-सुविधांचा जो बोजवारा उडाला आहे त्याबाबत चर्चा करणार आहेत. सदर बैठकीत उपस्थित केल्या जाणाऱ्या समस्याप्रधान प्रश्न मार्गी लावण्यासाठी पालिकेला आठ दिवसांचे 'अल्टिमेटम' देण्यात येणार आहे. अन्यथा शहरातील लोकाभिमुख समस्यांच्या संदर्भात प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अत्यंत आक्रमक व भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे.

> **शहरातील कायदा व सुव्यवस्था बिघडू नये, यासाठी आम्ही तूर्तास संयमाची भूमिका घेतली आहे. मात्र, पालिकेने अमळनेरकरांसह आमच्या सहनशीलतेचा जास्त अंत पाहू नये. अन्यथा मोठा उद्रेक अटळ आहे.**
> **– सौ. जयश्रीताई पाटील,** *गटनेत्या, 'शविआ'.*

दरम्यान, शनिवार, दि. २० जून रोजी दुपारी चार वाजता झालेल्या बैठकीस सौ. जयश्रीताई पाटील यांच्यासह नगरसेवक डॉ. डिगंबर महाले, विजय कहारू पाटील, सचिन पाटील, शोभाबाई गढरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन राजपूत, जितेंद्र ठाकूर, नरेंद्र संदानशीव, विक्रांत पाटील, मुक्तार खाटीक, विजय राजपूत, नसरोद्दीन हाजी, सयाजीराव पाटील, नरेंद्र चौधरी, ॲड. यज्ञेश्वर पाटील, भूषण भदाणे, निलेश महाजन, संजय भिला पाटील, इम्रान खाटीक, गौरव महाजन, दुर्गेश पाटील, सुनील शिंपी, आशाबाई चावरिया, आरिफ मेवाती, तुषार संदानशीव, वेद पाटील आदी उपस्थित होते.

# वादळी पावसालाही न जुमानता टाळला वीज खंडितचा धोका

## महावितरण कर्मचाऱ्यांची सकारात्मक कामगिरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील आर. के. नगर परिसरात गुरुवार, दि. १८ जून रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास वादळी वाऱ्यासह काही वेळ मुसळधार पाऊस बरसला. त्यामुळे या परिसरातील मुख्य वीजवाहिनीचा खांब आणि रोहित्र तिरपे झाल्याने वीजपुरवठा खंडित होण्याचा धोका निर्माण झाला होता. अचानक उद्भवलेल्या या परिस्थितीमुळे संपूर्ण परिसर रात्री अंधारमय राहण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले होते. अशा प्रतिकूल आणि धोकादायक परिस्थितीतही महावितरण कर्मचाऱ्यांनी आपली नैतिक जबाबदारी आणि कर्तव्यनिष्ठा सिद्ध करून दाखविली. जोरदार वारा, सतत कोसळणारा मुसळधार पाऊस याची तमा न बाळगता जीव धोक्यात घालून परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यासाठी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

शरद गोसावी आणि महेश फुलपगार यांनी कोणतीही भीती मनात न बाळगता भरपावसात वीज सुरळीत करण्यासाठीचे काम हाती घेतले. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी संयम, धैर्य आणि कौशल्याच्या बळावर काम पूर्ण करत परिसरातील वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी अथक प्रयत्न केले. त्यांच्या या धाडसी आणि समर्पित कार्यामुळे संभाव्य धोका टळला. या कामासाठी सहाय्यक अभियंता हितेंद्र बढे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच जितेंद्र चौधरी, विशाल पाटील आणि शिवाजी शिंदे यांनीही मोलाचे सहकार्य करत काम यशस्वी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

ही केवळ एक तांत्रिक दुरुस्ती नसून सेवाभाव, कर्तव्यनिष्ठा आणि जनतेप्रती असलेल्या बांधिलकीचे उत्तम उदाहरण असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. संकटकाळात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता जनतेची गैरसोय टाळण्यासाठी झटणाऱ्या अशा कर्मचाऱ्यांमुळेच आज समाजाचा प्रशासनावर विश्वास टिकून आहे



*अमळनेर : येथील महावितरणचे कार्यालय.*

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**
स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!



*अमळनेर : शिवसेनेच्या ६० व्या वर्धापन दिनानिमित्त शुक्रवार, दि. १९ जून रोजी शहरातील श्री संत सखाराम माऊली रिक्षाथांब्याजवळ मिठाई वाटप करून आनंदोत्सव साजरा करताना युवा सेनेचे तालुकाप्रमुख राहुल कंजर, शहरप्रमुख प्रवीण पाटील, उपतालुकाप्रमुख जयेश चव्हाण, उपशहरप्रमुख सनी चव्हाण, तुषार सोनार, शहर संघटक पंकज चौधरी, सोशल मीडिया तालुकाप्रमुख यश हापसे, शहरप्रमुख भरत पवार, विधानसभा क्षेत्रप्रमुख सुरेश पाटील, पालिका गटनेते पंकज चौधरी, पालिकेतील प्रतोद नावीद शेख तसेच नगरसेवक दीपक चौगुले.*

# शिवसेनेच्या युवा सेनेतर्फे वर्धापन दिनानिमित्त अमळनेरात मिठाई वाटून आनंदोत्सव साजरा

## संघटना अधिक मजबूत करण्याचा विविध पदाधिकाऱ्यांचा निर्धार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शिवसेनेच्या ६० व्या अर्थात हीरक महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त युवा सेनेतर्फे मिठाई वाटप करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. शिवसेनेची जनसेवेची परंपरा आणि हिंदुत्वाची विचारधारा अधिक बळकट करण्याचा संकल्प यावेळी सर्व युवा शिवसैनिकांकडून करण्यात आला.

शिवसेना ही सामान्य कार्यकर्त्यांना नेतृत्वाची संधी देणारी संघटना असून, माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा एक सामान्य रिक्षाचालक ते राज्याचे मुख्यमंत्री असा प्रेरणादायी प्रवास लाखो युवकांसाठी आदर्श असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. गुलाबराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली तसेच माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली युवा सेना लोकसभा संपर्कप्रमुख निखिल चौधरी, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख रोहित कोगटा तसेच शिवसेना तालुकाप्रमुख गुलाब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली

**पान २ वर**

# पैलाडच्या मुख्य रस्त्यावर तुटकी जाळी; जीवितहानीची शक्यता

## नागरिकांमध्ये तीव्र संताप; पालिकेविरोधात आंदोलनाचा इशारा



*अमळनेर : पैलाडमधील मुख्य रस्त्यावरील तुटलेली जाळी.*

> **आमच्या प्रभागात लोखंडी जाळी बसविली होती. परंतु पुढील पुलाजवळ काम सुरू असल्यामुळे संबंधित ठेकेदाराने अवजड वाहनांची वाहतूक सुरूच ठेवल्यामुळे ती जाळी पुन्हा तुटली. मात्र, त्यामुळे आमच्या प्रभागातील नागरिकांना याचा मोठ्या प्रमाणावर त्रास होत आहे. आम्ही पालिकेकडे या कामासाठी पाठपुरावा केला आहे. मात्र, तरीही लवकरच या ठिकाणी जाळीसह गतिरोधक बसवून हा प्रश्न मार्गी लावू.**
> **– सौ. पुष्पा पंकज भोई,**
> *नगरसेविका प्रभाग क्र. १२*

> **आमच्या प्रभागातील मुख्य रस्त्यावरील लोखंडी जाळी अवजड वाहनांमुळे तुटलेली आहे. ती दुरुस्त व्हावी, यासाठी आम्ही पालिकेकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. लवकरच नवीन लोखंडी जाळी बसविण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी काळजी करू नये.**
> **– सुयोग ज्ञानेश्वर धनगर,**
> *नगरसेवक प्रभाग क्र. १२*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पैलाड भागातील वॉर्ड क्र. १२ मध्ये संतश्री सखाराम महाराज संस्थानाकडून पारोळ्याकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील मोठ्या नाल्यावर बसविलेली लोखंडी जाळी पूर्णपणे तुटली आहे. त्यामुळे या ठिकाणी जीवितहानीची शक्यता व्यक्त होत आहे. सदर जाळी महिनाभरापूर्वीच बदलून बसविली होती. मात्र, ती निकृष्ट दर्जाची असल्याने अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे महिनाभरातच पुन्हा तुटली आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये पालिकेप्रती तीव्र संताप व्यक्त होत आहे.

हा मुख्य रस्ता असून, यावरून अहोरात्र वाहनांची वर्दळ सुरू असते. गटारीवरील ही कटर (खड्डा) अत्यंत मोठी आहे. रात्री अंधारामुळे वाहनचालकांना ही तुटलेली जाळी दिसत नाही. त्यामुळे येथे रोज काहीना काही अपघात घडतच आहेत. एखाद्याचा जीव गेल्यावर पालिका प्रशासनाला जाग येईल का? असा संतप्त प्रश्न स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे.

या गंभीर समस्येबाबत नागरिकांनी अनेकवेळा वॉर्डातील संबंधित नगरसेवकांकडे धाव घेऊन तक्रारी केल्या. मात्र, नगरसेवक आणि प्रशासन या दोन्ही घटकांकडून या विषयाकडे दुर्लक्षच केले गेले आहे. कोणीही लोकभावना समजून घ्यायला किंवा ही जाळी दुरुस्त करायला तयार नाही. आम्ही पालिका प्रशासनाला हात जोडून विनंती करतो, की कोणत्याही मोठ्या दुर्घटनेची वाट न पाहता नागरिकांच्या सुरक्षेसाठी ही लोखंडी जाळी तातडीने दुरुस्त करण्यात यावी. जर पालिकेने तत्काळ यावर उपाययोजना केली नाही, तर आम्ही सर्व नागरिक मोठ्या संख्येने पालिकेवर मोर्चा नेवू. तसेच येथे कोणतीही दुर्घटना झाल्यास त्याला संपूर्णपणे पालिका प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा गोलू धनगर, सागर पाटील, सुजीत पाटील, शरद भोई, गुड्डू शिरसाठ, राज भील, सुभाष भील, विशाल बिऱ्हाडे यांनी दिला आहे.

केवळ महिनाभरापूर्वी बसविलेली ही जाळी एवढ्या लवकर तुटतेच कशी? असा प्रश्न करत ही जाळी अत्यंत निकृष्ट दर्जाची असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या निकृष्ट कामामुळे भविष्यात एखादा मोठा अपघात झाल्यास संबंधित ठेकेदार आणि निष्काळजी प्रशासन यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणीही जोर धरू लागली आहे.

## संपादकीय

# भेसळखोरांमागील हस्तक कोण?

एखादा सरकारी अधिकारी आपल्या कर्तव्याची अगदी निष्ठेने अंमलबजावणी करतो, त्यावेळी त्याचे किती महत्त्वपूर्ण आणि दूरगामी परिणाम घडून येतात हे तुकाराम मुंढे यांच्या भेसळविरोधी मोहिमेतून सिद्ध झाले आहे. अर्थातच मुंढे यांची मोहीम जितकी भेसळ माफियांविरुद्धची धडाकेबाज कारवाई आहे तितकीच राज्य सरकारचे धिंडवडे काढणारीही ठरते. अन्न आणि औषध प्रशासन विभाग हा अत्यंत महत्त्वपूर्ण आणि एकूण सामाजिक आरोग्याच्यादृष्टीने अतिशय संवेदनशील ठरतो. ज्या पद्धतीने मुंढे एकापाठोपाठ कारवाई करत आहेत. त्यातून अनेक प्रकारच्या जीवनावश्यक वस्तूंमधल्या भेसळीची धक्कादायक माहिती समोर येत आहे. दुग्धजन्य पदार्थांपासून ते रोजच्या जेवणाखाण्यातल्या तेलतूपापर्यंत अत्यंत बेमालूमपणे भेसळ केली जाते. ज्यातून प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्यावर दूरगामी असे घातक परिणाम होतात. ज्यातून अनेक प्रकारचे आजार, रोग, व्याधी, निर्माण होण्याची शक्यता असते. भेसळ करण्याची ही प्रवृत्ती म्हणजे गेल्या अनेक वर्षांची समाजविघातक विकृतीची परंपरा आहे. तुकाराम मुंढे यांच्या या धडक कारवाईने दोन गोष्टी अतिशय ठळकपणे स्पष्ट झाल्या. एक म्हणजे यापूर्वीचे या विभागातले अधिकारी कसे बेजबाबदारपणे वागत होते. आणि कर्तव्यशून्य अशा या लोकांच्या छुप्या समर्थनातूनच भेसळखोरांनी हैदोस घातला होता. अशा प्रकारचे शासकीय किंवा राजकीय समर्थन असल्याशिवाय भेसळखोरांचा हा धुमाकूळ चालूच शकत नाही. त्या विभागातल्या अधिकाऱ्यांचा बेजबाबदारपणाच यातून ठळकपणे उघडा झाला तर दुसरीकडे राज्य सरकार ज्या पारदर्शक कारभाराचा ढोल बडवत असते. ती पारदर्शकताही किती बेगडी स्वरूपातली आहे हेसुद्धा मुंढे यांच्या या कारवाईतून आपोआप स्पष्ट झालेले आहे. ही केवळ भेसळखोरांविरुद्धची कारवाई नाही तर राज्य सरकारमधल्या भेसळखोरांच्या हस्तकांवरचा तो हल्लाबोल ठरतो.

राज्य सरकारच्या तथाकथित पारदर्शकतेचा बुरखाही त्यानिमित्ताने फाडला जातो आहे. आज मुंढे यांना कारवाईची मोकळीक देऊन सरकार त्यांच्या पाठीशी आहे असा जरी दावा सरकारने केला. यापूर्वी अशाच धडक कारवाया का होऊ शकल्या नाहीत याचे सरकारकडे कोणतेही उत्तर नाही. ही वस्तुस्थिती आहे. भेसळीचे गैरप्रकार हे जेव्हा इतक्या मोठ्या प्रमाणावर होतात त्यावेळेला ती भेसळ करणाऱ्यांचे धाडस निश्चितपणे वाढलेले असते. कारण त्यांना आपल्यावर कोणतीही कारवाई होणार नाही याची खात्री असते. शिवाय कारवाई झाली तरी आपण त्यातून सहिसलामत बाहेर पडू याच्याबद्दलही प्रचंड आत्मविश्वास असतो. म्हणूनच तुकाराम मुंढे यांनी स्वतः पुढाकार घेऊन जी मोहीम सुरू केली आहे ती सर्वसामान्य माणसाला दिलासा देणारी ठरते. त्यांच्या प्रत्येक कृतीला स्वाभाविकपणे सामान्य माणसाचे समर्थनही मिळते. परंतु इथेसुद्धा पुन्हा तोच प्रश्न उपस्थित होतो. मुंढे यांनी या खात्याचा कारभार स्वीकारण्यापूर्वी अन्न, औषध प्रशासन विभागातले अधिकाधिक कर्मचारी इतके सुस्त आणि मस्त कसे काय होते. अशाच प्रकारच्या धडक कारवाया या विभागातल्या अधिकाऱ्यांकडून अपेक्षित असतात. परंतु त्या अधिकाऱ्यांनी इतक्या धडकपणे कोणतीही कारवाई केली नाही. याचीदेखील दोन कारणे असू शकतात. एक म्हणजे अधिकाऱ्याने कारवाई जरी केली तरी स्थानिक स्तरावरचे राजकीय कार्यकर्ते, नेते या अधिकाऱ्यांवर दबाव टाकत असतात. कारण इतक्या बिनधास्तपणे भेसळ करण्याची मुभा जेव्हा मिळते. तेव्हा अशा भेसळखोरांमध्ये अनेक लोक राजकारण्यांचे बगलबच्चे असतात. त्यांना सर्व प्रकारचे संरक्षण मिळत असते. आणि दुसरे कारण म्हणजे या अधिकाऱ्यांचेसुद्धा भेसळखोरांबरोबर साटेलोटे असते. म्हणूनच डोळ्यादेखत भेसळीचे प्रकार करत असताना त्याकडे निर्लज्जपणे डोळेझाक करण्याचा प्रकार घडतो.

तुकाराम मुंढे यांना आमचे आवाहन आहे की, त्यांनी जशी वेगवेगळ्या वस्तू किंवा खाद्यपदार्थांमधली, औषधांमधली भेसळ शोधण्याचे काम सुरू केले आहे. तशीच मोहीम त्यांनी त्यांच्या स्वतःच्याच अन्न, औषध प्रशासन विभागात सुरू करायला हवी. कारण या भेसळखोरांकडे दुर्लक्ष करून त्यांना छुपे समर्थन देण्याचे कामच आतापर्यंत होत राहिले. म्हणूनच अन्न, औषध प्रशासनातली ही भ्रष्टाचारी भेसळही दूर केली पाहिजे. खात्यांतर्गत कारभार तितकाच निर्भेळ करण्याची मोहीम मुंढे यांनी सुरू करावी. साधारणपणे गेल्या महिनाभरापासून राज्यभरात वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकण्यात आले. अगदी वडापाव किंवा खाद्यपदार्थ बनवण्याच्या प्रक्रियेपासून ते दुधात बेमालूमपणे होणाऱ्या अत्यंत धोकादायक भेसळीविरोधात कारवाई होत गेली. त्यातले वास्तव पाहिल्यानंतर लोकांच्या रोजच्या जेवणाखाण्यातल्या या वस्तूंमध्ये विष पेरण्याचे कामच भेसळखोरांनी केलेले आहे, या मोहिमेदरम्यान जे भेसळखोर सापडले आहेत त्यांच्याविरुद्ध तितकीच कठोर कारवाई अपेक्षित असते. परंतु दुर्दैवाचा भाग असा आहे की भेसळखोरांविरुद्धचे कायदे अतिशय लेचेपेचे आहेत. कितीही मोठी कारवाई झाली तरी त्यातून सहिसलामत सुटण्याच्या अनेक पळवाटा उपलब्ध आहेत. जोपर्यंत कठोर शिक्षा होणे आणि अशांचे परवाने कायम स्वरूपी रद्द होणे या कारवाया तितक्याच धडाडीने होण्याची गरज आहे. जोपर्यंत मुंढे त्या खात्यामध्ये आहेत, तोपर्यंत ही धडक मोहीम सुरू राहील. त्यांच्यानंतर काय हा प्रश्न पुन्हा अनुत्तरीत राहणार आहे. खरे तर थेट मुख्यमंत्र्यांनी याची दखल घेऊन लोकांच्या दैनंदिन जगण्याच्या विषयाकडे गंभीरपणे लक्ष दिले पाहिजे. एकूणच अन्न, औषध प्रशासन विभागाची साफसफाई केली पाहिजे. मध्यंतरी मुख्यमंत्र्यांनी प्रत्येक विभागाला शंभर दिवसांच्या कामाचे उद्दिष्ट दिले होते. त्यात अन्न आणि औषध प्रशासनाने काय काम केले हेही कळू शकलेले नाही. सरकारकडून गलेलठ्ठ पगार घेतात, पण इतक्या महत्त्वाच्या जबाबदारीचेही भान ठेवत नाही. अन्नाला न जागणाऱ्यांमुळेच भेसळीचा हा हौदोस सुरू राहतो.

## अमळनेरात मिठाई वाटून आनंदोत्सव साजरा

**पान १ वरून :** हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमात अमळनेर युवा सेनेचे तालुकाप्रमुख राहुल भास्कर कंजर, शहरप्रमुख प्रवीण पुरुषोत्तम पाटील, उपतालुकाप्रमुख जयेश चव्हाण, उपशहरप्रमुख सनी चव्हाण, उपशहरप्रमुख तुषार सोनार, शहर संघटक पंकज अरुण चौधरी तसेच शिवसेना सोशल मीडिया तालुकाप्रमुख यश विलास हापसे यांनी हा उपक्रम व कार्यक्रम हाती घेतला कार्यक्रमास शिवसेना शहरप्रमुख भरत पवार, विधानसभा क्षेत्रप्रमुख सुरेश अर्जुन पाटील, गटनेते व नगरसेवक पंकज चौधरी, पालिकेचे प्रतोद व नगरसेवक नावीद शेख तसेच नगरसेवक दीपक चौगुले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिवसेनेच्या गौरवशाली ६० वर्षांच्या वाटचालीचा गौरव करत संघटना अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# राष्ट्रजीवनाला दिशा देणारे युगपुरुष : प. पू. डॉ. केशव हेडगेवार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय राष्ट्रजीवनाच्या पुनरुत्थानासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करणाऱ्या प. पू. डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांची रविवार, दि. २१ जून रोजी पुण्यतिथी. ही पुण्यतिथी केवळ स्मरणाची नव्हे, तर त्यांच्या विचारांचे आणि कार्याचे पुनर्मूल्यांकन करण्याची संधी आहे. राष्ट्रभक्ती, संघटनशक्ती, चारित्र्यनिर्मिती आणि समाजएकात्मता या मूल्यांच्या आधारे त्यांनी उभारलेले कार्य आजही विविध स्तरांवर प्रभाव निर्माण करत आहे.

**जन्म, बालपण आणि राष्ट्रभावनेची जडणघडण**

डॉ. हेडगेवार यांचा जन्म १ एप्रिल १८८९ रोजी नागपूर येथे झाला. बालपणापासूनच त्यांच्यामध्ये प्रखर देशभक्ती आणि स्वाभिमानाचे संस्कारa होते. त्या काळात भारत ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली होता. परकीय सत्तेविषयी असलेला त्यांचा विरोध आणि मातृभूमीविषयीचे प्रेम लहानपणापासूनच दिसून येत होते. विद्यार्थीदशेत त्यांनी ब्रिटिशांच्या सत्तेविरुद्ध आवाज उठविला. 'वंदे मातरम' घोषणेमुळे त्यांना शालेय शिक्षणात अडचणींना सामोरे जावे लागले. परंतु राष्ट्रभक्तीचा मार्ग त्यांनी कधीही सोडला नाही.

**क्रांतिकारी विचारांचा प्रभाव**

उच्च शिक्षणासाठी ते कोलकता येथे गेले. तेथे वैद्यकीय शिक्षण घेत असताना अनेक क्रांतिकारी संघटनांशी त्यांचा संपर्क आला. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारणाऱ्या युवकांच्या कार्याचा त्यांच्यावर प्रभाव पडला. क्रांतिकारी चळवळीतील सहभागातून त्यांनी एक महत्त्वाची गोष्ट अनुभवलीदेशभक्त व्यक्तींची कमतरता नव्हती; मात्र समाज संघटित नसल्यामुळे राष्ट्रीय शक्ती प्रभावीपणे उभी राहत नव्हती. ही जाणीव पुढे त्यांच्या जीवनकार्याचा पाया ठरली.

**स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग**

डॉ. हेडगेवार यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. ते इंडियन नॅशनल काँग्रेसच्या विविध आंदोलनांत सहभागी झाले. ब्रिटिशविरोधी भाषणांमुळे त्यांना कारावासही भोगावा लागला. त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्य हे केवळ राजकीय सत्ता हस्तांतरण नव्हते; तर राष्ट्राच्या आत्मविश्वासाचे, सांस्कृतिक स्वत्वाचे आणि सामाजिक एकात्मतेचे पुनरुज्जीवन होते.

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना**

विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर १९२५ मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना हा त्यांच्या जीवनातील सर्वांत महत्त्वाचा टप्पा ठरला. त्यांच्या मते, राष्ट्रनिर्मितीचा पाया व्यक्तिनिर्मितीत आहे. सुसंस्कारित, शिस्तबद्ध, निःस्वार्थी आणि राष्ट्रनिष्ठ व्यक्ती घडल्या तर समाज आणि राष्ट्र आपोआप सुदृढ होईल. या विचारातून संघाच्या शाखा पद्धतीचा जन्म झाला. शाखेमध्ये शारीरिक, बौद्धिक आणि नैतिक विकासाला महत्त्व



पुण्यतिथी विशेष

देण्यात आले. जात, भाषा, प्रांत, आर्थिक स्तर यांपलीकडे जाऊन समाजाला एका सूत्रात बांधण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

**दूरदर्शी संघटक**

डॉ. हेडगेवार यांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची असामान्य संघटनक्षमता. त्यांनी व्यक्तिपूजेऐवजी कार्यपद्धतीला महत्त्व दिले. संघटनेचा विस्तार करताना त्यांनी प्रसिद्धी, पद किंवा वैयक्तिक गौरव यांचा कधीही आग्रह धरला नाही. ते म्हणत असत, की राष्ट्रकार्य हे व्यक्तीपेक्षा मोठे असते. म्हणूनच त्यांनी संघटन उभारताना कार्यकर्त्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करण्यावर भर दिला.

**चारित्र्यनिर्मितीचे महत्त्व**

त्यांच्या विचारांत चारित्र्यनिर्मितीला केंद्रस्थानी स्थान होते. समाजातील अनेक समस्या व्यक्तीच्या स्वार्थी वृत्तीमुळे निर्माण होतात, असे त्यांचे मत होते. त्यामुळे राष्ट्रसेवेची प्रेरणा, शिस्त, कर्तव्यभावना आणि नैतिक मूल्ये यांचे संवर्धन आवश्यक असल्याचे ते सांगत. त्यांच्या कार्यपद्धतीत भाषणांपेक्षा प्रत्यक्ष कृतीला अधिक महत्त्व होते. त्यांनी स्वतःच्या जीवनातून साधेपणा, त्याग आणि सेवाभाव यांचे उदाहरण घालून दिले.

**समाज एकात्मतेचा आग्रह**

भारतीय समाजातील विविधता ही शक्ती बनली पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. सामाजिक भेदभाव, जातीय विभाजन आणि परस्पर अविश्वास यांवर मात करून समाजामध्ये एकात्मता निर्माण करणे हे राष्ट्रनिर्मितीसाठी आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. संघाच्या शाखांमध्ये सर्व स्तरांतील लोकांना समान स्थान देण्याचा प्रयत्न त्यांच्या कार्यातून दिसून येतो.

**नेतृत्वातील वैशिष्ट्ये**

डॉ. हेडगेवार यांच्या व्यक्तिमत्त्वातील काही ठळक गुण पुढीलप्रमाणे होते. अद्वितीय राष्ट्रभक्ती, दूरदृष्टी आणि संघटनकौशल्य, साधेपणा व विनम्रता, निर्णयक्षमता, कार्यकर्त्यांवरील विश्वास, प्रभावी संवादशैली, त्याग आणि समर्पण, शिस्तप्रियता, त्यांच्या सहवासात आलेल्या अनेक कार्यकर्त्यांनी पुढे विविध क्षेत्रांत नेतृत्वाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली.

राष्ट्रजीवनावरील प्रभाव

डॉ. हेडगेवार यांनी सुरू केलेल्या कार्याचा प्रभाव पुढील अनेक दशकांत विविध सामाजिक, शैक्षणिक, सेवा आणि राष्ट्रजीवनाशी संबंधित क्षेत्रांमध्ये दिसून आला. त्यांनी रुजविलेली संघटना, स्वयंसेवा आणि राष्ट्रनिष्ठा यांची संकल्पना अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहिली आहे. त्यांनी उभारलेली कार्यपद्धती व्यक्तिनिष्ठ नसून मूल्यनिष्ठ असल्यामुळे त्यांचे विचार आणि कार्य आजही अभ्यासाचा विषय ठरतात.

**अखेरचा प्रवास**

अखंड राष्ट्रकार्य करत असताना त्यांची प्रकृती खालावत गेली. २१ जून १९४० रोजी नागपूर येथे त्यांचे निधन झाले. केवळ ५१ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी उभे केलेले कार्य पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणास्थान बनले. डॉ. हेडगेवार यांचे जीवन म्हणजे राष्ट्रभक्ती, संघटनशक्ती आणि समर्पण यांचा प्रेरणादायी आदर्श होय. त्यांनी व्यक्ती घडवून राष्ट्र घडविण्याचा जो मार्ग दाखविला तो आजही अनेकांसाठी मार्गदर्शक आहे. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचे स्मरण करताना राष्ट्रहिताला सर्वोच्च मानणारी वृत्ती, सामाजिक एकात्मता आणि चारित्र्यसंपन्न जीवनाचा संदेश आत्मसात करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फेही त्यांना भावपूर्ण आदरांजली!



*अमळनेर : जळगाव जिल्हा ग्रामीण युवक काँग्रेस आणि अमळनेर विधानसभा युवक काँग्रेस यांच्या वतीने काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार, दि. १९ जून रोजी युवक संवाद कार्यक्रम झाला. तसेच नीट (राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा) पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ पदयात्रा काढून निवेदन देताना माजी जिल्हाध्यक्ष प्रदीप पवार, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेश पाटील, सचिव आशुतोष पवार, किरण पाटील, तुषार संदानशिव आदी.*

# राहुल गांधींच्या वाढदिवशी युवक संवाद

## नीट परीक्षा घोटाळ्याविरोधात युवक काँग्रेसचे आंदोलन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव जिल्हा ग्रामीण युवक काँग्रेस आणि अमळनेर विधानसभा युवक काँग्रेस यांच्या वतीने काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार, दि. १९ जून रोजी युवक संवाद कार्यक्रम झाला. तसेच नीट (राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा) पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ पदयात्रा काढून प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

भारतीय युवक काँग्रेसच्या राष्ट्रीय सचिव शाम्भवी शुक्ला आणि महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या उपाध्यक्षा तथा मीरा-भाईंदर महापालिकेच्या विरोधी पक्षनेत्या आफरीन सय्यद यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम झाला. जळगाव जिल्हा काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष प्रदीप पवार अध्यक्षस्थानी होते. नीट पेपरफुटी प्रकरणामुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. त्यानंतर राहुल गांधी यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी विविध मान्यवरांनी युवकांना मार्गदर्शन केले.

युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेश दगडू पाटील यांनी प्रास्ताविक केले. महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सचिव आशुतोष पवार, किरण पाटील आणि तुषार संदानशिव यांनी युवक काँग्रेसच्या आगामी कार्यक्रमांची माहिती दिली. विविध पदाधिकारी व नेत्यांनी युवकांना संघटनात्मक कामकाज आणि सामाजिक प्रश्नांबाबत मार्गदर्शन केले.

अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या संघटन सृजन अभियानांतर्गत निवड झालेल्या विविध आघाड्या व विभागांच्या अध्यक्षांचा युवक काँग्रेसतर्फे सत्कार करण्यात आला. यामध्ये सेवादल, इतर मागासवर्गीय विभाग, अनुसूचित जाती विभाग, आदिवासी विभाग, अल्पसंख्याक विभाग तसेच समाजमाध्यम विभागाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा गौरव करण्यात आला.

बैठकीनंतर मराठा मंगल कार्यालय ते तहसील कार्यालय अशी पदयात्रा काढून प्रांताधिकारी मयूर भंगाळे व तहसीलदार रूपेशकुमार सुराणा यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनाद्वारे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली. तसेच नीट पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. याशिवाय बाहेरगावी परीक्षा केंद्र असलेल्या विद्यार्थी आणि पालकांना प्रवेशपत्राच्या आधारे मोफत प्रवास सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशीही मागणी करण्यात आली. कार्यक्रम यशस्वितेसाठी विविध पदाधिकाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले. मनोहर महाले यांनी सूत्रसंचालन केले. गौरव देशमुख यांनी आभार मानले.

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आज योग शिबिराचा समारोप

### महिला पतंजली योग समितीतर्फे नागरिकांना उपस्थितीचे आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्ताने महिला पतंजली योग समितीतर्फे शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात दररोज सकाळी ५.३० ते ७.०० या वेळेत भव्य योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. शुक्रवार, दि. १९ जूनपासून सुरू असलेल्या या शिबिराचा रविवार, दि. २१ जून २०२६ रोजी समारोप होणार आहे.

यंदा रविवार, दि. २१ जून २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन असल्याने १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. योग दिनाच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या या तीन दिवसीय शिबिराचा भव्य योग महोत्सवाने समारोप होईल. 'पहिली अंघोळ घामाची, ती आपल्या कामाची' या संदेशासह 'करो योग, रहो निरोग'चा मंत्र देत महिला पतंजली योग समितीने नागरिकांना संपूर्ण परिवारासह सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले आहे. योगाचे फायदे सर्वांनाच माहीत असले, तरी त्याची सुरूवात करणे महत्त्वाचे असल्याचे सांगत आळस झटकून योगाचा प्रवास पुन्हा सुरू करण्याचे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे. या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांनी योगाचा प्रत्यक्ष अनुभव घेत निरोगी जीवनशैली अंगीकारावी तसेच रविवार, २१ जून २०२६ रोजी होणाऱ्या योग महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

# किडनी स्वच्छ करणारे ५ पेये

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

किडनी हा शरीराचा नैसर्गिक फिल्टर आहे, जो रक्तातील घाण, अतिरिक्त क्षार आणि विषारी घटक लघवीवाटे बाहेर टाकतो. चुकीचा आहार, कमी पाणी पिणे किंवा मानसिक ताणामुळे किडनीवर लोड येतो. रोज सकाळी उपाशीपोटी कोमट पाण्यात अर्धे लिंबू पिळून साखर न घालता पिणे फायदेशीर ठरते. कोथिंबीर लघवीचे प्रमाण वाढवण्यास आणि किडनी स्वच्छ ठेवण्यास मदत करते. कॅनबेरी ज्यूस लघवीच्या मार्गातील संसर्ग रोखण्यासाठी अत्यंत गुणकारी आहे. बीट आणि गाजरामध्ये मोठ्या प्रमाणात अँटी-ऑक्सिडंट्स असतात. हे रस शरीरातील युरिक ॲसिड आणि विषारी घटक बाहेर काढून किडनीचे फिल्टर साफ ठेवतात. किडनी स्वच्छ ठेवण्याचा सोपा उपाय म्हणजे भरपूर पाणी पिणे.

# निरोगी, संतुलित आणि आनंदी जीवनाचा संदेश

**आंतरराष्ट्रीय योग दिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी २१ जून हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. योग ही भारताने जगाला दिलेली एक अमूल्य सांस्कृतिक आणि आध्यात्मिक देणगी आहे. शरीर, मन आणि आत्मा यांचा समतोल साधण्याचे प्रभावी माध्यम म्हणून योगाला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली आहे. आधुनिक जीवनातील ताणतणाव, धकाधकीची जीवनशैली, वाढते मानसिक आणि शारीरिक आजार यांवर मात करण्यासाठी योगाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय योग दिन निरोगी, संतुलित आणि आनंदी जीवनाचा संदेश देणारा जागतिक उपक्रम आहे.

**आंतरराष्ट्रीय योग दिनाची पार्श्वभूमी**

योगाची परंपरा भारतात हजारो वर्षांपासून अस्तित्वात आहे. प्राचीन ऋषी-मुनींनी योगशास्त्राच्या माध्यमातून शरीर आणि मनाच्या विकासाचा मार्ग दाखविला. योगाचे महत्त्व जगासमोर प्रभावीपणे मांडण्यासाठी भारताने संयुक्त राष्ट्रसंघात प्रस्ताव ठेवला. ११ डिसेंबर २०१४ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने हा प्रस्ताव स्वीकारला आणि २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित करण्यात आला. त्यानंतर २१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिन जगभर उत्साहात साजरा करण्यात आला.

**२१ जूनच का निवडला?**

२१ जून हा वर्षातील सर्वांत मोठा दिवस मानला जातो. उत्तर गोलार्धात या दिवशी सूर्यप्रकाशाचा कालावधी सर्वाधिक असतो. भारतीय परंपरेनुसार हा दिवस आध्यात्मिक दृष्ट्याही महत्त्वाचा मानला जातो. सूर्य, ऊर्जा आणि जीवन यांचे प्रतीक असल्याने योगाच्या व्यापक संदेशाशी या दिवसाचे विशेष नाते आहे. योग दिन साजरा करण्यामागील उद्देश आहेत.

**योगाचे महत्त्व**

शारीरिक आरोग्यासाठी उपयुक्त योगामुळे शरीर लवचिक राहते, स्नायू बळकट होतात आणि शरीरातील विविध अवयवांचे कार्य अधिक प्रभावीपणे चालते. नियमित योगाभ्यासामुळे लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदयविकार यांसारख्या समस्यांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होते.

**मानसिक स्वास्थ्य सुधारते**

आजच्या स्पर्धात्मक युगात मानसिक ताणतणाव ही मोठी समस्या बनली आहे. योग आणि ध्यानामुळे मन शांत राहते, एकाग्रता वाढते आणि चिंता, नैराश्य यांसारख्या समस्यांमध्ये घट होते.

**जीवनशैलीत सकारात्मक बदल**

योग व्यक्तीमध्ये शिस्त, संयम आणि आत्मविश्वास निर्माण करतो. नियमित योगाभ्यासामुळे जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो.

**सामाजिक आणि आध्यात्मिक विकास**

योग हा केवळ शारीरिक व्यायाम नसून आत्मशोध आणि आत्मविकासाचा मार्ग आहे. तो व्यक्तीला स्वतःशी आणि समाजाशी अधिक सुसंवादी बनवतो.

**आधुनिक काळातील योगाची गरज**

तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे शारीरिक हालचाली कमी होत आहेत. दीर्घकाळ संगणक किंवा मोबाईलसमोर बसणे, अनियमित आहार, अपुरी झोप आणि वाढता तणाव यामुळे अनेक आरोग्यविषयक समस्या निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत योग हा एक प्रभावी आणि सहज उपलब्ध उपाय आहे.

**योग दिनाचे विविध उपक्रम**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शाळा, महाविद्यालये, सरकारी कार्यालये, सामाजिक संस्था आणि विविध संघटनांकडून योग शिबिरे, प्रात्यक्षिके, जनजागृती मोहिमा, व्याख्याने आणि सामूहिक योगसत्रांचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमांद्वारे समाजात आरोग्याविषयी जागरूकता निर्माण केली जाते.

आंतरराष्ट्रीय योग दिन हा भारताच्या प्राचीन ज्ञानपरंपरेचा जागतिक गौरव आहे. योग ही केवळ व्यायामपद्धती नसून निरोगी, संतुलित आणि आनंदी जीवन जगण्याची एक जीवनशैली आहे.

## अमळनेर कृषी उत्पन्न बाजार समिती दैनिक बाजारभाव

| प्रकार | भाव | |
|---|---|---|
| | कमी | जास्त |
| गहू | २३२१ | २३८१ |
| बाजरी | २२०० | २३४१ |
| दादर | २९०० | ३००० |
| हा.ज्वारी | २३०० | २३८१ |
| मका लाल | २०६७ | २०८७ |
| मुंग | ७३२५ | ७५०० |
| उडीद | -- | ७५०० |
| हरभरा काबुली व्ही.टू. | ५७०० | ६२३१ |
| हरभरा गावराणी | -- | -- |
| हरभरा गुलाबी | ५००० | ५१०० |
| हरभरा चापा | ५४७५ | ५५०० |
| हरभरा डॉलर सफेद | ६८०० | ६९०० |
| हरभरा गुल्लर | -- | -- |
| चवळी | ५२०० | ५५५५ |
| तूर | ६९५१ | ७१०० |
